# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधिक्षक
गडचिरोली, दिनांक २१/०४/२०१७

# <u>जहाल ३ नक्षलवादयांना अटक</u>



**मैनी ऊर्फ जिमो उंगा लाती,**
**वय- ३२ वर्ष,**



**सरिता ऊर्फ मुळे कट्टा मडकाम**
**वय- २३ वर्ष,**



**पाकली ऊर्फ कारी बुधू गडे,**
**वय- २८ वर्ष**

गडचिरोली व छत्तीसगड पोलीसांचे गोपनिय माहीतीच्या आधारे संयुक्त नक्षलविरोधी अभियान सॅन्ड्रा जंगल परिसरात राबवित असतांना सॅन्ड्रा गावाजवळ संशयास्पद हालचाली वरुन पोलीसांनी गावात शोध मोहिम राबविली असतांना काही महिला पळून जातांना दिसल्या. पोलीसांनी पाठलाग करुन संबंधित संशयीत महिलांना ताब्यात घेऊन विचारपुस केली असता ते नक्षल दलममध्ये कार्यरत असल्याचे निदर्शनास आले असून त्यांची नावे १) मैनी/जिमो उंगा लाती, वय- ३२ वर्ष, रा. मु. पालनार, ता. जि. बिजापुर (छत्तीसगड), ही सन - २००३ पासून सॅन्ड्रा दलममध्ये कार्यरत आहे. २) सरिता ऊर्फ मुळे कट्टा मडकाम, वय- २३ वर्ष, रा. मु. कोठमेट्टा, पो. भैरमगड ता. जी. बिजापुर (छत्तीसगड), सन - २०१३ पासून सॅन्ड्रा दलममध्ये कार्यरत. ३) पाकली ऊर्फ कारी बुधु गडे, वय- २८ वर्ष, रा. मु दुप्पाळ परसेगड एरीया ता. जि. बिजापुर (छत्तीसगड), सन २०१२ पासून सॅन्ड्रा दलममध्ये कार्यरत .

आतापर्यत या तिनही जहाल महिला नक्षलवादयांचा अनेक चकमकीमध्ये सहभाग असून जाळपोळीच्या घटना, भुसुरुंग स्फोट घडवणे, सामान्य नागरिकांच्या हत्या अशा अनेक देशविघातक कृत्यामध्ये सहभाग आहे.

मा. पोलीस अधिक्षक डॉ. अभिनव देशमुख सो. यांचे मार्गदर्शनाखाली अपर पोलीस अधिक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांच्या नेतृत्वामध्ये सी-६० पथक चे भैयाजी कुळसंगे, गंगाराम सिडाम व छत्तीसगड पोलीसांचे मोठे यश मानले जात आहे. या तीन जहाल महिला नक्षलवादयांच्या अटकेमुळे नक्षल चळवळीला मोठा हादरा बसला आहे.